पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
Pune metropolitan Region Development Authority, Pune
नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे- 411044
PUNEMETROPOLIS
New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune-४११०४४
Ph No. : ०२०- २५९ ३३ ३४४ / ३५६ / ३३३ / फोन. नं. 020- 259 33 344/ 356 / 333 Email: comm@pmrda.gov.in

सुधारित विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

(मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) नियम क्र. २.६ नुसार)

जा.क्र.:DP/बीएचए/HAV/मौ. वाघोली /ग.नं.१२१०/१अ व इतर /प्र.क्र. १७८४/२४-२५/ 90098 दि.05/02/२०२५

प्रति,

श्री. विजय हरीभाऊ माटे व
श्री. माणिक हरीभाऊ माटे,
रा. ४/११, न्यु हिल टॉप सोसायटी,
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-११.

मौजे- वाघोली, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे, येथील **ग.नं.- १२१०/१अ, १२१०/२, १२१०/३अ, १२१०/४, १२१०/५, क्षेत्र- १०४००.०० चौ.मी.** क्षेत्रावरील सुधारित **"समुह गृहबांधणी"** प्रकल्पामधील एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार रेखांकन व बांधकाम प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे.

आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट ' अ ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त प्रस्तावास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(राम चारठाणकर)
सह महानगर नियोजनकार,
(विकास परवानगी विभाग)
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे पु.म.प्र.वि.प्रा. पुणे

मौजे- वाघोली, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे, येथील **ग.नं.- १२१०/१अ व इतर, क्षेत्र- १०४००.०० चौ.मी.** क्षेत्रावरील सुधारित **"समुह गृहबांधणी"** प्रकल्पामधील रेखांकन व बांधकाम प्रस्ताव.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि.- / /२०२५ रोजीचे पत्र क्र. -------- सोबतचे परिशिष्ट 'अ'

१) मंजूर सुधारित नकाशाप्रमाणेच जागेचा विकास व बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) सदर विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील. बांधकाम सुरु केल्याबाबत प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. तद्नंतर त्यापुढे आवश्यकतेनुसार विहीत मुदतीमध्ये सदर परवानगी व प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन न घेतल्यास सदरचे परवानगी व प्रमाणपत्र संपुष्टात येईल.

३) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (महसूल शाखा) यांचेकडील आदेश जा.क्र. पमह/एनए/एसआर/६७/१२, दि. ०४/०९/२०१२ या पत्रातील जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि या वरील भार याबाबत पत्रा मधील अटीं व शर्ती अर्जदार/ विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहतील.

४) प्रस्तावासोबत सादर उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली पुणे यांचेकडील मोजणी क्र. अ.अ.ता.ह.का.मो.र.क्र.६०४८/२२, दि. ०१/०३/२०२२ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहिवाटीबाबत अर्जदाराने /विकासकाने/ जमीनमालकाने याबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदर जमिनीचे वहीवाटीचे/ हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद/ न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / विकासक / जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी / वहिवाट, अर्जदार /विकासक / जमिनमालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीव्दारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

५) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक /विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

६) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम, १९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक- ०३/०६/२०२४ रोजी नोटरी ॲड. ममता के. शाह यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र क्र.- ७४७२/२०२४ सादर केले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार /जमीनमालक /विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

७) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील

सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्यांची रुंदी, १५% सुविधा भुखंड व १०% खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही.

तसेच मंजूर रेखांकनानुसार अंतर्गत रस्ते, सुविधा भूखंडातील क्षेत्र त्याचप्रमाणे मंजूर प्रादेशिक योजनेचे रस्ते / रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र जागा मालकास/ विकासकास वाढीव चटईक्षेत्राच्या बदल्यात संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे झाल्यास अशा अनुषंगिक क्षेत्राची मोजणी जागा मालकाने /विकसकाने संबंधित भूमी अभिलेख विभागाकडे रितसर अर्ज करुन घेणे बंधनकारक राहील. तदनंतर अशा क्षेत्राखालील जमिनीचे खरेदीखत संबंधित नियोजन प्राधिकरणाचे नावाने जागा मालकाने /विकसकाने स्वखर्चाने करुन देऊन तसा ७/१२ उतारा व त्याप्रमाणे प्रत्येक्ष जागेचा ताबा दिल्यानंतरच अशा क्षेत्राचा वाढीव चटई क्षेत्र मिळणेबाबत आवश्यक त्या बांधकाम नकाशा व अनुषंगिक कागदपत्रासह अर्ज करण्यास अर्जदार पात्र राहतील.

८) मंजूर नकाशात दर्शविलेप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम व खुली ठेवणे आवश्यक राहील.

९) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त मंजूर नकाशानुसार **"रहिवास व वाणिज्य"** याप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील. इमारतीच्या वापरात बदल करावयाचा असल्यास त्यास प्राधिकरणाची पूर्वमंजूरी घ्यावी लागेल.

१०) इमारतीचे जोतेपर्यंत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर वास्तुविशारद यांचे तर्फे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील नमूद विहीत नमुण्यात प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. त्याचप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना बांधकाम प्रस्तावांतर्गत जमिनीचे महसूल /भूमी अभिलेखात एकत्रिकरण /उपविभागणी केलेला अद्यावत ७/१२ उतारा व बिनशेती मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक राहील.

११) अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले वर्गीकृत /प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीनमालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.

१२) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांने/ विकासकांने /जमीनमालकाने भुखंड/ सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

१३) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या व उंची,मंजूर रेखांकन/बांधकाम नकाशांवर दर्शविल्यापेक्षा जास्त असता कामा नये.

१४) नियोजित बांधकामाचे क्षेत्र,भुखंडावर अन्य बांधकाम अस्तित्वात असल्यास त्यासह एकुण बांधकाम क्षेत्र,सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजन रस्ते/रस्तारुंदी क्षेत्र नकाशावर दर्शविलेनुसार प्रत्यक्ष जागेवर असणे आवश्यक आहे.

१५) जागेतील/ जागेलगतच्या नाल्याच्या/ नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांची राहील.

१६) स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये. तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

१७) स्ट्रक्चरल इंजिनिअर / डिझायनर यांनी तयार केलेल्या Structural Design नुसार प्रत्यक्ष जागेवर विकास करणेची जबाबदारी विकासक व सुपरवायझर यांची संयुक्तिक राहील.

१८) अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील **क्र. ७४६९/२०२४, दिनांक-०३/०६/२०२४** अन्वये दिलेल्या शपथपत्रास अधिन राहुन ही परवानगी देण्यात येते असुन एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.(नियम क्र. ७.१)

१९) शासन नगर विकास विभागाकडील दि.१९/११/२००८ चे निदेश क्र. टिपीव्ही-४३०८/४१०२/ प्र.क्र.३५९/०८/नवि-११ नुसार अर्जदार / विकासक/ जमिनमालक व वास्तुविशारद यांनी बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकूण चटईक्षेत्र (Carpet area) नमूद केलेले आहे. सदर नमूद चटई क्षेत्रा (Carpet area) बाबत आकडेमोड, गणितीय चुका इ. बाबत वास्तुविशारद व अर्जदार / विकासक/ जमिनमालक संयुक्तिकरित्या जबाबदार राहतील.

२०) नियोजित इमारतीसाठी/ विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची सोय आपण अश्वासित केलेल्या सक्षम प्राधिकरणाने/ ग्रामपंचायतीने न केल्यास या प्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापुर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता सोबत हमीपत्र क्र. ७४६८/२०२४, दि. ०३/०६/२०२४ अन्वये अर्जदार / विकासक / जमिन मालक यांनी स्वखर्चाने प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची सुयोग्य व्यवस्था प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे बंधनकारक राहील.

२१) ओला व सुक्या कचऱ्याकरिता सदर जागेत स्वतंत्र कंटेनरची सोय करणे आवश्यक राहील. विघटन होण्याऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडुळखत प्रकल्प अर्जदार / विकासक /जमिनमालक यांना स्वखर्चाने करावयाचा आहे.

२२) सदर जमिनीचे निव्वळ क्षेत्रफळ १०४००.०० चौ.मी. असुन प्रत्येकी ८० चौ.मी. प्रमाणे सदर जमिनीवर १३० वृक्ष लागवड करणे व त्यांचे संगोपन करणे अर्जदार/विकसक/जागामालक यांचेवर बंधनकारक राहील.

२३) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम २००९ मधील अनुसूची १ कलम ७ (एच) मधील प्रमाणकानुसार वृक्षांची लागवड करतांना स्थानिक वृदु हवामान तसेच स्थानिक उपलब्ध वृक्षांच्या जाती विचारात घेऊन अनुरूप असलेल्या संवर्गातील वृक्षांची निवड करण्याची काळजी घ्यावी.

२४) मिळकतीवर स्थानिक जातीच्या वृक्षांची लागवड करणेसाठी ३x३ फूट आकाराची जागा प्रत्येक चार मीटर अंतरावर सोडणे आवश्यक आहे व तशी जागा नकाशावर दाखवणे आवश्यक आहे.

२५) बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर काम चालू करण्याआधी वृक्ष पूर्ण काढणे/पुनर्रोपण करणेसाठी मा. वृक्ष प्राधिकरण समितीची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

२६) अंतिम भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करते वेळी वृक्ष प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील वृक्ष लागवडीबाबतच्या अटी व शर्तीचे पालन न झाल्यास वृक्ष संवर्धनाच्या अनुषंगाने प्रती झाड र.रु. २,०००/- या प्रमाणे अनामत रक्कम भरणे तसेच निकषानुसार झाडे लावल्यानंतर वृक्षांसंबंधीत अंतिम नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

२७) उपरोक्त प्रस्तावाबाबत वृक्षांविषयी भविष्यामध्ये निर्माण होणारे आक्षेप व न्यायालयीन प्रकरणांची संपूर्ण जबाबदारी अर्जदार / जागा मालक / विकसक यांची राहील.

२८) शासन निदेशानुसार बांधकाम करताना फ्लाय ॲशचा वापर करणे बंधनकारक राहील.

२९) सौर उर्जेवर पाणी तापवण्यासाठीची यंत्रणा/ सौर उर्जेवर वीज निर्मिती करणारी यंत्रणा अर्जदार/ विकासक /जमिनमालक/ यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

३०) वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभारणे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक असून पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडाची जोपासणा यासाठी करणे आवश्यक आहे.

३१) रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

३२) विकासांअतर्गत उत्सर्जित जल, मलमूत्र, कचरा यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मंजुरीने योग्य प्रक्रिया व निस:रण व्यवस्था करणे आवश्यक आहे. प्रक्रिया केलेले कोणत्याही प्रकारचे उत्सर्जित पाणी वा पदार्थ लगतचे नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात मिसळता कामा नये, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अर्जदार/विकासक/ जमिनमालक यांची राहील.

३३) केंद्र शासनाच्या MINISTRY OF CIVIL AVIATION ची अधिसुचना क्र. G.S.R ७५१ (E) दि. ३०/०९/२०१५ अन्वये इमारतीच्या उंचीवर बंधने घालण्यात आलेली आहेत. AVIATION

विभागाच्या CCZM नुसार प्रस्तावाखालील जागा P९ झोन मध्ये समाविष्ट आहे. सदर नकाशानुसार कमीत कमी अनुज्ञेय उंचीचा विचार करता महत्तम अनुज्ञेय होणारी उंची- ५८६.०० मी. इतकी आहे. तसेच कार्यालयात उपलब्ध असलेला अभिलेख नकाशानुसार AMSL ५६६.०० मी. आहे. सर्वात उंच इमारतीच्या टॉप लेवलची उंची- ४९.०५ मी. + ५६६.०० मी. =६१५.०५ मी. इतकी येते. त्यामुळे AVIATION विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तथापि, अर्जदार यांनी AVIATION विभागाकडील पत्र जा.क्र. SWAC/२५६४/६/३३३५/ATS(BM), दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये एकूण उंची 74.00m AGL (Building Height 69.00+Crane Height 5.00) or 640.50m करिता ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेले असून सदर ना-हरकत प्रमाणपत्रातील अटी / शर्ती अर्जदार/ विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहतील.

३४) प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. २.०९ नुसार पुर्णत्वाचे प्रमाणपत्र अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी सादर करुन नियम क्र. २.१० नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याखेरीज कोणत्याही इमारतीचा भागशः / पुर्णतः वापर सुरु केल्यास अर्जदार/ विकासक/जमिनमालक कारवाईस पात्र राहील.

३५) प्रमाणित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद क्र. ९.३.९३(xiv) नुसार विशेष इमारतीबाबत :-

a) प्रमाणित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद क्र. ३.३.९ (B) नुसार प्रस्तावित इमारती सभोवताली ६.०० मी. रुंदीचे पाथवे किमान ४५ टन वजनाचे फायर इंजिनचा भार पेलु शकेल या प्रमाणे डिझाईन करुन विकसीत करणे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक आहे.

b) अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी प्रस्तावित केल्यानुसार सर्व उंच इमारती स्टिल्ट वर असणे आवश्यक राहील त्याचबरोबर वाहनतळ सुविधा प्रमाणित एकात्मिक सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद क्र. ८.२ नुसार प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

c) उंच इमारतीचे नियोजनानुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचेकडील पत्र **क्र. FPH/७०३/२०२४-२५, दि. २९/०१/२०२५ ने** दिलेल्या Provisional Fire N.O.C. मधील अटीं/ शर्तीची पूर्तता करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

d) प्रमाणित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र. ९.३.९३(xiv) नुसार बाबींची पुर्तता तसेच अग्निप्रतिबंधक उपाययोजनाबाबत तरतूद क्र.९.३२ मधील बाबींची पुर्तता करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक बंधनकारक राहील.

e) नेहमीच्या वापरासाठीच्या पाणी पुरवठयाशिवाय अग्निप्रतिबंधक व्यवस्थेकरीता, पाणीपुरवठा बाबतची पुर्तता अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी स्वखर्चाने, स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

f) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र. ९.२७ नुसार लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

g) अशा इमारतींचे Structural Design हे भुकंप प्रतिबंधक असणे आवश्यक राहील. अर्जदाराने / विकासकाने/ जमिनमालकाने इमारतीचे Structural Stability बाबत नोंदणीकृत Structural Engineer चे प्रमाणपत्र संबंधित अग्निशमन अधिकारी यांचेकडे व या प्राधिकरणाकडे दाखल करणे आवश्यक राहील.

h) भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्व अग्निशमन यंत्रणा व सुविधांची पुर्तता करुन सदर यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असलेबाबत अग्निशमन विभागाकडील अंतिम नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

i) मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचेकडील पत्र **क्र. FPH/७०३/२०२४-२५, दि. २९/०१/२०२५** अन्वये Provisional Fire N.O.C. मधील अटी व शर्तीस अधिन राहून दिले आहे. हे ना हरकत प्रमाणपत्र देताना फेरबदल झाल्यास अशा नियोजनास संबंधित मुख्य अग्निशमन अधिकारी/ संचालक यांचे सुधारित ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

३६) विषयांकित प्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले एकूण (Gross FSI + Non FSI) बांधकाम क्षेत्र ३०६७०.४५ चौ.मी. आहे. त्यामुळे या प्रकल्पास पर्यावरण विभागाकडील State Environment Assessment Authority कडून Environment Clearance प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानुसार अर्जदार / विकासक /जमिनमालक यांनी यापूर्वी पर्यावरण विभागाकडील पत्र क्र. SIA/MH/INFRA२/४२१६०६/२०२३, दि. ०८/०२/२०२४ अन्वये प्रमाणपत्र प्राप्तकेले आहे. सदर प्रमाणपत्रामध्ये एकूण (Gross FSI + Non FSI) ३४०२७.२८ चौ.मी. बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्यात आले आहे. सबब या प्रमाणपत्रामध्ये नमूद बांधकाम क्षेत्राचे वरील बांधकामास सुधारित Environment Clearance प्रमाणपत्र प्राप्त झालेशिवाय उर्वरित बांधकाम /विकास करता येणार नाही. सदर अट प्रकल्पाचे अर्जदार/ विकासक /जमीनमालक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील. तसेच पर्यावरण विभागाकडील परिपत्रक क्र. SEIAA २०१४/CR-०२/TC-3, दिनांक ३०/०१/२०१४ मधील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे प्रकल्पाचे अर्जदार / विकासक /जमीनमालक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

३७) मोठया इमारत बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मजूरांमधील गरोदर माता, स्तनदा माता आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांकरिता शेड बांधणे, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाळणाघर इ. तात्पुरत्या सुविधा कंत्राटदार किंवा बांधकाम विकासक यांनी करणे आवश्यक आहे.

३८) प्रकरणी बांधकाम परवानगी वेळी प्रमाणित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूदीनुसार छाननी शुल्क चलन क्र. **SCRF/१७८४/२४-२५**, र.रु. ८६,०९०/-, **दि. १५/१०/२०२४ व छाननी शुल्क फरक चलन क्र. DCSC/१०४२, र.रु. ७,७४०/- दि.१६/०१/२०२५** व सुधारित बांधकाम क्षेत्रातील फरकानुसार प्रिमीयम शुल्क चलन क्र. PRMM/१५७, र.रु. १९,०३,४६०/-, **दि. १६/०१/२०२५**, ॲन्सलरी शुल्क चलन क्र. ANCF/३१०, र.रु. ६३,५३,२००/-, दि. १६/०१/२०२५, विकास शुल्क चलन क्र. **DEVF/१३३८**, र.रु. २१,९२,०३०/-, **दि. १६/०१/२०२५**, वाढीव विकास शुल्क चलन क्र. **ADEV/१७६२**, र.रु.२१,९२,०३०/-, **दि. १६/०१/२०२५**, कामगार कल्याण उपकर चलन क्र. LWCS/१४२२, र.रु. २३,६७,३७०/- (१००%), दि.-१६/०१/२०२५ व पूर्व मंजूर प्र.क्र.४०६/२२-२३ मधील वाढीव विकास शुल्काच्या फरक चलन क्र. ADEV/१७६२, र.रु. १४,९२,०७०/-, **दि. १६/०१/२०२५** अन्वये या चलनाचा भरणा केला आहे.

३९) अर्जदार यांच्या प्रस्तावित भुखंडातून नाला जात आहे असे प्रारुप विकास आराखड्यामधून दिसून येते. सदर नाला Diversion करीता अर्जदार यांनी कार्यकारी अभियंता, खडकवासला पाठबंधारे विभाग, कार्यालयाचे जा.क्र. खपावि/प्रशा १५८३ /सन २०२४, दि.१२/०३/२०२४ रोजीचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यकत्या अटी / शर्तीसह सादर केले आहे. उक्त नाहरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी / शर्तीना अधिन राहून व Chinalise नाल्याचा Cross Section बांधकाम परवानगी नकाशांवर दर्शवून सुधारित बांधकाम नकाशे सादर केले आहेत. सदर ना-हरकत प्रमाणपत्रातील नमुद अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

४०) UDCPR २०२० अन्वये प्रारुप विकास आराखड्यामधील नाल्यापासून ६.०० मी. अंतर दर्शवून इमारत दर्शविली आहे. सदर ६.०० मी. चे अंतर जागेवर कायम ठेवणे अर्जदार/ विकसक यांचेवर बंधनकारक राहील. ६.०० मी. अंतराबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी अर्जदार/ विकसक यांची राहील.

४१) प्रस्तावीत सुधारति बांधकाम परवानगी अर्जदार यांनी सादर केलेल्या ॲड. नंदा साळुंके, नोटराईज्ड क्र. ४२२/२०२५, दि.०४/०२/२०२५ रोजीच्या हमीपत्रास अधिन राहुन देण्यात येत आहे. सबब सुधारीत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने तक्रारीत तथ्य अढळुन आल्यास सदरची बांधकाम परवानगी विना मोबदला MRTP Act १९६६ च्या कलम ५१ अन्वये रद्द करणेत येईल. याची नोंद अर्जदार/ विकसक यांनी घ्यावी.

४२) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शुल्क, प्रिमीयम शुल्क, विकास शुल्क, ॲन्सलरी शुल्क, वाढीव विकास शुल्क व कामगार कल्याण उपकर व इतर शुल्कांबाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४३) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावासोबतच्या रेखांकन/बांधकाम नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्तावासोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.

१/८/१५.

(राम चारठाणकर)
सह महानगर नियोजनकार,
(विकास परवानगी विभाग)
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु.म.प्र.वि.प्रा.
★ पुणे ★

Housiey.com

Housiey.com